महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ४५ वा दिनांक : १०/११/२०२४ वार : रविवार

## राजकारण कारल्याच्या भाजीसारखे कडू झाले आहे:संभाजीराजेंचा हल्लाबोल, महायुती आघाडीवरही केली टीका



**नाशिक** : "राजकारण कारल्याच्या भाजीसारखे कडू झाले आहे," असे म्हणत स्वराज्य पक्षाचे प्रमुख छत्रपती संभाजीराजे यांनी सर्व पक्षांवर जोरदार टीका केली. नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघातील स्वराज्य पक्षाचे उमेदवार दशरथ पाटील यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत संभाजीराजे बोलत होते. या सभेत त्यांनी महाविकास आघाडी आणि महायुतीवरही टीका केली.

छत्रपती संभाजीराजे म्हणाले की, आजचे राजकारण आजवर कधीच बघितले नव्हते. येथे खोके, गद्दारी, आणि बेईमानी सुरू आहे. बाळासाहेब ठाकरे नेहमीच म्हणायचे की शिवसेना काँग्रेसशी युती करणार नाही. मग उद्धव ठाकरे काँग्रेससोबत कसे गेले? खुर्चीसाठी असा निर्णय घेतला असेल, तर ते गद्दारी नाही का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

संभाजीराजे पुढे म्हणाले, पंतप्रधान मोदी ७० हजार कोटींचा आरोप करत होते. आज त्याच अजित पवारांसोबत सरकार आहे. सोनिया गांधी यांच्या परदेशीचा मुद्दा घेऊन शरद पवार काँग्रेसमधून बाहेर पडले, नंतर पुन्हा त्यांच्यासोबतच गेले. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले आंबेडकर यांचे नाव घ्यायचे पण तसे आपण वागतो का? आमच्याकडे शिवाजी महाराजांचा स्वाभिमान आहे.

पुढे बोलताना संभाजीराजे म्हणाले, पूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचे शस्त्र तलवार होते. आता बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले 'पेन' शस्त्र आपल्यासोबत आहे. महात्मा फुलेंची सामाजिक रचना, बाबासाहेब आंबेडकरांच्या समतेचा विचार आणि या पेनच्या शाईमधून शिवाजी महाराजांचे विचार लिहिले जातात. महाराष्ट्र इतरांना दिशा देणारे राष्ट्र आहे. पण, या सर्व प्रस्थापितांनी महाराष्ट्र गिळून टाकला आहे.

सदाभाऊ खोत यांच्यावर देखील संभाजीराजे यांनी टीका केली आहे. तो सदाभाऊ खोत काहीही बोलतो, त्याला उत्तर देणार तो कुत्रा आहे म्हणतो, हा प्रचार आहे का? असा सवाल उपस्थित केला. महायुती १५०० रुपये देतात, महाविकास आघाडी ३ हजार देणार म्हणतात, त्यापेक्षा महिलांना रोजगार द्या, असे म्हणत त्यांनी महायुती आणि महाविकास आघाडीवर टीका केली आहे.

## मोदींचा संविधानात बदल करण्याचा डाव होता, पण आम्ही त्यांना त्यांची जागा दाखवली



**उदगीर** : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी शरद पवार यांनी शनिवारी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानात बदल करण्याचा कट रचला होता. पण लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राने त्यांना त्यांची जागा दाखवून दिली, असे ते म्हणाले.

शरद पवार यांची शनिवारी उदगीर येथे सभा झाली. या सभेत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर संविधानात बदल करण्याचा कट रचल्याचा आरोप केला. ते म्हणाले, ५-६ महिन्यांपूर्वी आपण लोकसभेच्या निवडणुकीला सामोरे गेलो. त्यावेळी देशाचे राज्य गेल्या १० वर्षांपासून मोदींच्या हातात होते. देशातील शेतकरी वर्ग संकटात सापडला होता. त्याची अस्वस्थता घालवायची असेल तर मोदींना हलवून जागे करण्याची गरज होती. त्यासाठी आम्ही काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वात

विरोधी पक्षांची इंडिया नावाची आघाडी स्थापन केली. त्यानंतर आम्ही लोकसभा निवडणुकीला सामोरे गेलो.

नरेंद्र मोदी यांना लोकसभा निवडणुकीत ४०० हून जास्त जागा हव्या होत्या. त्यांनी यासाठी ४०० पारचा नारा दिला होता. त्या घोषणेत काहीतरी पाप असल्याचा संशय आम्हाला आला होता. आमचा संशय अगदी खरा होता. या सरकारने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या संविधानात काही बदल करण्याचा डाव रचला होता. त्यातून जनतेच्या अधिकारांवर गदा येणार होती. हे कट कारस्थान पूर्ण करण्यासाठी मोदी व त्यांच्या सरकारला ४०० च्या आसपास जागांची गरज होती.

मी महाराष्ट्रातील जनतेला धन्यवाद देऊ इच्छितो. येथील जनतेने मोदी व शहांना त्यांची जागा दाखवण्याचे काम केले. यामुळे संविधानात बदल करण्याचा कट उधळला गेला, असे शरद पवार म्हणाले.

**महायुतीच्या काळात महाराष्ट्राची सर्वच क्षेत्रात पिछेहाट**

आज महाराष्ट्रापुढे अनेक प्रश्न आहेत. हे एक देशातील एक महत्त्वाचे राज्य आहे. हे राज्य शैक्षणिक चळवळीत प्रचंड योगदान देणारे आहे. शेतीतही महाराष्ट्राचे उल्लेखनीय योगदान आहे. पण ज्यांच्या हातात सत्ता आहे, त्यांनी या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले. त्याचे परिणाम आज महाराष्ट्राला भोगावे लागत आहेत. काँग्रेस आघाडीच्या काळात आम्ही महाराष्ट्राला क्रमांक एकचे राज्य बनवले. पण आता हा क्रमांक ६ वर घसरला.

अनेक क्षेत्रांत महाराष्ट्र मागे पडले. उद्योगधंदे महाराष्ट्राचे वैशिष्ट होते. आम्ही साखर कारखानदारी काढली. अन्य कारखाने काढले. हाताला काम मिळेल याची व्यवस्था केली. पूर्वी ही कारखानदारी मुंबईपर्यंतच मर्यादित होती. ती मुंबईबाहेर कशी नेता येईल? याची काळजी आम्ही घेतली.

आम्ही यासंबंधी अनेक निर्णय घेतले. शेतीवर आधारित कारखानदारीचे सूत्र अंमलात आणले. त्याचा मोठा फायदा राज्याला झाला. विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वात लातूर जिल्हा मागे राहिला नाही याचा मला आनंद आहे. पण आज अनेक कारखाने बंद पडलेत. त्यामुळे महायुतीच्या हातात सत्ता देणे हे शहाणपणाचे लक्षण नाही, असे शरद पवार म्हणाले.

## महायुतीच्या सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असतील:केंद्रीय मंत्री अमित शहा यांचे स्पष्ट संकेत



**सांगली** : केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी महाराष्ट्रातील प्रचार सभेत आगामी काळात महायुतीच्या सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असतील असे संकेत दिले. सांगली जिल्ह्यातील शिराळा येथे भाषण करताना अमित शहा यांनी देवेंद्र फडणवीस यांचे नाव घेत तेच मुख्यमंत्री असतील असे संकेत दिले आहेत. महाराष्ट्रामध्ये देवेंद्र फडणवीस यांनाच आणायचे, अशी महाराष्ट्रातील जनतेची इच्छा असल्याचे अमित शहा यांनी म्हटले आहे. त्यामुळे आता राजकीय वर्तुळात मुख्यमंत्री पदाबाबत चांगलीच चर्चा सुरू झाली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या नंतर महायुतीचा मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोण? याबाबत चांगलीच खलबते सुरू आहेत. राज्यात २० नोव्हेंबर रोजी मतदान असले आणि २३ रोजी निकाल लागणार असला तरी मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोण असेल? याबाबत सुरुवातीपासूनच चर्चा रंगली आहे. त्यात महायुतीमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार या तीनही नेत्यांच्या नावावर चर्चा सुरू आहे. तर महाविकास आघाडीमध्ये उद्धव ठाकरे, नाना पटोले, जयंत पाटील आणि सुप्रिया सुळे यांच्या नावाची चर्चा आहे. मात्र या वादात आता अमित शहा यांनी थेट देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचे संकेत दिल्याने याबाबत राजकीय चर्चा रंगली आहे.

**एकत्र बसून निर्णय घेणार - अजित पवार**

मुख्यमंत्री पदाबाबत आम्ही शहा यांच्या वक्तव्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. आम्ही महायुती म्हणून याबाबत एकत्र बसून निर्णय घेणार असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. महायुतीचाच मुख्यमंत्री होईल, असा दावा देखील अजित पवार यांनी केला आहे. मात्र, अमित शहा यांनी जे संकेत दिले आहेत याबाबत विचारले असता, तो त्यांचा अधिकार असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. राज्यात तीन पक्ष एकत्र निवडणुकीला सामोरे जात आहेत. त्यामुळे युतीमध्ये दोन पावले मागे यावे लागतात तर कोणाला दोन पावले पुढे जावे लागत असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १० नोव्हेंबर २०२४


## राणेंनी १० टक्के कमिशन घेतले:उद्योगपतीच्या तक्रारीनंतर त्यांचे मंत्रीपद नाकारले, विनायक राऊत यांचा गंभीर आरोप





**सिंधुदुर्ग :** शिवसेना ठाकरे गटाचे माजी खासदार विनायक राऊत यांनी भाजप नेते नारायण राणे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. दिल्लीतील एका प्रतिष्ठित उद्योगपतीने पंतप्रधान कार्यालयाला मेल करून नारायण राणेंनी मंत्रीपद मिळालेल्या खात्याचा बट्ट्याबोळ केला, त्यांच्या पीएने १० टक्के कमिशन देखील घेतले असल्याचा आरोप विनायक राऊत यांनी केला आहे.

कुडाळ येथे महाविकास आघाडीचे उमेदवार वैभव नाईक यांच्या प्रचार सभेत बोलताना विनायक राऊत म्हणाले, नारायण राणे यांच्या पीएने १० टक्के कमिशन घेतल्याची तक्रार करण्यात आली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या पत्राची दखल घेत नारायण राणे यांची मंत्रिमंडळात समावेश केला नाही. तसेच नारायण राणे यांनी हे खोटे असल्यास त्यांनी उत्तर द्यावे, असे आव्हान राऊत यांनी केले आहे.

विनायक राऊत म्हणाले, इटूकली, बिटूकली, पुटूकली राणेंची काय औकात? राणे तुमची औकात काय? उद्धव ठाकरेंना धमकी देणे सोडा. आज बाळासाहेब असते तर गोळ्या घातल्या असत्या असे म्हणणाऱ्या नारोबाची बाळासाहेबांनी हकालपट्टी केली होती. राणेंनी शिवसेना संपवणार असल्याचे म्हणले होते. त्याच राणेंना २०२४ साली मुलाच्या प्रचारासाठी धनुष्यबयन घेऊन दारोदार फिरावे लागत आहे. राणेंना पराभव करण्याचा इतिहास या कुडाळ मालवणमध्ये घडला. त्याच राणेंच्या मुलाला, नीलेश राणे यांचा पराभव करण्याची संधी वैभव नाईक यांना मिळाली आहे.

पुढे बोलताना विनायक राऊत म्हणाले, पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी जनतेचा पैसा लुबाडण्याचे काम केले. चिपी विमानतळ सुरू करण्यासाठी आम्ही प्रयत्न केले. मात्र चिपी विमानतळ बंद का याचे उत्तर नारायण राणे यांनी द्यावे. राणेंना चिपी विमानतळ बंद पडले याचा थांग पत्ता लागला नाही. ते विमानतळ पुन्हा मी सुरू करणार. राणेंना त्या विमानतळावरून यायचे नाही. मात्र सर्वसामान्य लोकांना इथूनच यायचे आहे, असे राऊत म्हणाले.

## भाजप उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सुधाकर खाडे यांची हत्या:सांगली जिल्ह्यातील खळबळजनक घटना, कुऱ्हाडीचे घाव घालून केले ठार



**सांगली :** भाजप स्टार्टअप इंडियाचे प्रदेशाध्यक्ष सुधाकर खाडे यांची कुऱ्हाडीचे घाव घालून हत्या करण्यात आल्याची खळबळजनक घटना सांगलीत घडली आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ही घटना घडल्यामुळे मोठी खळबळ माजली आहे. पोलिसांनी या प्रकरणी एका संशयिताला ताब्यात घेतले आहे.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, सुधाकर खाडे यांचा शनिवारी सकाळी १० च्या सुमारास पंढरपूर रोडवरील राम मंदिरालगत असलेल्या जागेत प्रॉपर्टीच्या कारणावरून एका व्यक्तीशी वाद झाला होता. या वादातून त्यांच्या मानेवर कुऱ्हाडीने वार करण्यात आला. त्यानंतर गंभीर अवस्थेत त्यांना मिरज येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आली. तिथे त्यांना मृत घोषित करण्यात आले.

या घटनेनंतर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी एका संशयित व्यक्तीला ताब्यात घेतले आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर हे हत्याकांडा घडल्यामुळे एकच खळबळ माजली आहे.

**सुधाकर खाडेंची का झाली हत्या?**

सुधाकर खाडे यांनी मिरज - पंढरपूर रस्त्यावरील राम मंदिरालगत चंदनवाले मळा येथील पावणे ४ एकर जमीन सचिन जगदाळे नामक व्यक्तीकडून विकसनासाठी घेतली होती. पण त्यावर लक्ष्मण चंदनवाले यांनी हरकत घेतली होती. त्यामुळे हे प्रकरण कोर्टात पोहोचले होते. गत काही महिन्यांपासून या प्रकरणी त्यांचा खाडे यांच्यासोबत वाद सुरू होता. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असतानाही खाडे शनिवारी सकाळी आपल्या सहकाऱ्यांसोबत वादग्रस्त भूखंडाला कुंपण घालण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांचा शेत जमिनीचे कब्जेधारक असणाऱ्या चंदनवाले कुटुंबीयांशी वाद झाला.

यावेळी सुधाकर खाडे व चंदनवाले कुटुंब यांच्यात जोरदार वाद झाला. त्यात कार्तिक चंदनवाले याने अचानक खाडे यांच्या मानेवर मागच्या बाजूने कुऱ्हाडीने हल्ला केला. हा घाव वर्मी बसल्यामुळे खाडे यांचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर चंदनवाले कुटुंबाने सुधाकर खाडे यांच्या सहकाऱ्यांवरही हल्ला चढवला. यामुळे घटनास्थळी मोठी धावपळ झाली. या धावपळीतच सुधाकर खाडे यांना मिरज येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण तिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या घटनेनंतर पोलिसांनी कार्तिक चंदनवाले नामक आरोपीस अटक केली आहे. हा आरोपी स्वतःहून पोलिस ठाण्यात हजर झाल्याची माहिती आहे. याप्रकरणी गांधी चौक पोलिसात कार्तिक चंदनवाले लक्ष्मण चंदनवाले, शंकर चंदनवाले, काशिनाथ चंदनवाले यांच्यासह ३ महिलांविरोधात गांधी चौक पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**कोण होते सुधाकर खाडे?**

सुधाकर खाडे यांनी शिवसेनेतून आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली. त्यानंतर ते महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत गेले. तिथे ते मनसेचे जिल्हाध्यक्ष झाले. त्यानंतर त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. सध्या ते भाजपच्या स्टार्टअप इंडियाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष होते. त्यांनी २०१४ मध्ये तासगाव-कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघातून विधानसभेची निवडणूकही लढली होती.

## महायुतीला जिंकवण्यासाठी पोलिस-गुंडांच्या बैठका:संजय राऊत यांचा आरोप; यादी देण्याची तयारी दर्शवत उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना इशारा



**मुंबई :** विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुतीला विजयी करण्यासाठी पोलिस व गुंडांच्या बैठकांचे सत्र सुरू असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. या प्रकरणी त्यांनी पोलिस सहआयुक्त (कायदा व सुव्यवस्था) सत्यनारायण चौधरी यांचे नाव घेत सरकार बदलल्यावर या सर्वांचा हिशेब करण्याचा इशारा दिला आहे.

संजय राऊत यांनी शनिवारी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी उपरोक्त आरोप केला. ते म्हणाले, राज्यातील पोलिस गुंडांच्या टोळ्यांशी संगनमत साधून सत्ताधारी महायुतीसाठी काम करत आहेत. पण सरकार बदलल्यावर या सर्वांचा हिशेब केला जाईल. भाजप व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी मुंबईतील विविध मतदारसंघांत ठाणे व पुण्यातील अनेक कुप्रसिद्ध गुन्हेगार काम करत आहेत.

कधीकाळी अंडरवर्ल्डमध्ये सहभागी असणारे हे लोक भाजप व शिंदेंसाठी निवडणुकीचे काम करत आहेत. राजकीय पक्ष ज्या प्रमाणे वेगवेगळ्या जागेवर निरीक्षकांची नियुक्ती करतात, त्याच धर्तीवर या गुन्हेगारांची नियुक्ती करण्यात आली आहे. कांजूरमार्ग, विक्रोळी, भांडुप, मुलुंड, दादर, ठाणे, कोपरी-पाचपाखाडी, ठाणे शहर, कलिना, कुर्ला भागात हे गुंड व त्यांच्या टोळ्या निवडणुकीचे काम करत आहेत. त्यासाठीच त्यांची जामिनावर सुटका करून त्यांना भाजप व शिंदे गटात प्रवेश देण्यात आला आहे.

**गुंडांच्या पोलिसांसोबत सातत्याने बैठका**

संजय राऊत पुढे म्हणाले, सद्यस्थितीत उच्चपदस्थ पोलिस अधिकारी व या गुंडांमध्ये सातत्याने बैठका होत आहेत. यात उच्चपदस्थ पोलिस अधिकाऱ्यांसह आयपीएस दर्जाच्या अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. महायुतीला निवडणूक जिंकून देण्यासाठी त्यांच्या रात्री बैठका होता. आम्ही निवडणूक आयोगाला यासंबंधीची माहिती देणार आहोत. हे पोलिस महाविकास आघाडीला मदत करणाऱ्या कार्यकर्त्यांवर तडीपारीची कारवाई करतात. त्यांच्यावर खोटे गुन्हा दाखल करून त्यांच्या कुटुंबीयांना धमकावतात.

**सत्यनारायण चौधरी यांचे घेतले नाव**

कायदा - सुव्यवस्था साभाळणाऱ्या प्रमुख पोलिस अधिकाऱ्यांनी सरकार बदलत असते हे लक्षात घ्यावे. गुंडांच्या मदतीने कुणी कुणाला मदत करत असेल तर त्यांचेही दिवस फिरतील. हे पोलिस अधिकारी त्यांच्या खात्याला कलंक लावण्याचे काम करत आहेत. सत्यनारायण चौधरी यांनी त्यांच्यापुढे काय जळत आहेत हे पहावे. आम्हाला यासंबंधी जास्त बोलायला लावू नका. सरकार बदलत आहे हे लक्षात घ्या. सर्वांचा हिशेब केला जाईल. मी या प्रकरणी वापर केला जात असलेल्या सर्व गुंडांची यादी देण्यास तयार आहे. कोणत्या अधिकाऱ्यांच्या कोणत्या गुंडांसोबत बैठका होत आहेत, वर्षा बंगल्यावरून कोणत्या सूचना दिल्या जात आहेत हे मी सांगू शकतो. सत्यनारायण चौधरी कुणासाठी काम करत आहेत, त्यांचे नाव मी देऊ का? मला कुणीही धमक्या देऊ नका एवढेच मी सांगतो, असेही संजय राऊत यावेळी बोलताना म्हणाले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १० नोव्हेंबर २०२४


## भाजप आमदार प्रशांत बंब यांच्या सभेमध्ये पुन्हा गोंधळ:गवळी शिवरा गावामध्ये वातावरण तापले; प्रश्न विचारणाऱ्या तरुणास धक्काबुक्की

**छत्रपती संभाजीनगर** : गंगापूर मतदारसंघामध्ये राजकीय वातावरण तापले आहे. गेले काही दिवस भाजप उमेदवार प्रशांत बंब यांच्या प्रचारसभामध्ये गोंधळ पाहायला मिळत आहे. गवळी शिवरा गावात २ तरुणांनी रेल्वे संदर्भात आश्वासन दिले होते अजून आले नाही म्हणत प्रश्न विचारले यानंतर सभेमध्ये गोंधळ झाला.

दरम्यान प्रशांत बंब यांनी त्या तरुणांना समजून सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांनी न ऐकल्याने सभेला उपस्थिती नागरिक आणि तरुणांमध्ये मोठा वाद झाला. याबाबत सभेत गोंधळ घालून वातावरण दूषित करण्याचा विरोधकांचा डाव असल्याचा आरोप सभेनंतर प्रशांत बंब यांनी केला आहे.

**अंबादास दानवेंची टीका**

प्रशांत बंब यांच्या सभेतील राड्यावर शिवसेना नेते अंबादास दानवे म्हणाले की, देशाचे गृहमंत्री अमित शहा आणि भाजप नेते विरोधी पक्षाच्या लोकांना खुल्या चर्चेचे आमंत्रण देत फिरतात. मग एक सामान्य माणूस चर्चेला आला की त्याला असं धमकवायचं आणि माणसं अंगावर सोडायची, हे भाजपच्या आमदाराला शोभते का? काय प्रशांत बंब, लोकांना उत्तर देता येत नाही की ही अशी दमदाटी पक्षाच्या शिबिरात शिकवली जाते का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

## एक्स-रे मशीनमध्ये तांत्रिक बिघाड; रुग्णांना माराव्या लागतात चकरा

**अमरावती** : जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन ) येथील पुन्हा एकदा रुग्णांना समस्यांना सामोरे जावे लागत आहे. येथील एक्स-रे मशीन मध्ये मोठा तांत्रिक बिघाड झाल्याने मागील पाच दिवसापासून बंद पडली आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना आल्या पावली परत जावे लागत आहे. तसेच पर्यायी व्यवस्था म्हणुन रुग्णांना सुपर स्पेशालिटी येथे पाठविण्यात येते. या मशिन्सचे पार्ट बाहेरून येणार असून, याला तीन ते चार दिवस लागणार असल्याचे जिल्हा सामान्य रुग्णालय प्रशासनाने सांगितले.

इर्विन सुरू होऊन जवळपास 96 वर्षे पूर्ण झाले आहेत. या रुग्णालयात रोज सरासरी हजार ते तेराशे रुग्ण हे बाह्यरुग्ण (ओपीडी) तपासणीसाठी येतात, तर उपलब्ध खाटांच्या संख्येपेक्षा जास्त रुग्ण याठिकाणी भरती असतात; परंतु, अजूनही या रुग्णालयात आरोग्य सुविधांची कमी आहे. अपघात, तसेच इतर आपत्कालीन वैद्यकीय परिस्थितीमध्ये सीटीस्कॅन, एक्स-रे आदींची गरज असते. तसेच रुग्णालयात एमआरआय सुविधा उपलब्ध नाही. जिल्हा सामान्य रुग्णालय येथे उपचारासाठी दाखल झालेल्या रुग्णाला एमआरआय चाचणीची गरज असल्यास डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात रेफर केले जाते. यात आता एक्सरे मशिन्स बंद पडल्याने आणखी एका समस्येची भर पडली.

सध्या सुपर स्पेशालिटीत केली पर्यायी व्यवस्था जिल्हा सामान्य रुग्णालयातील एक्स-रे मशीन बंद पडल्याने येथे येणाऱ्या रुग्णांना सुपर स्पेशलिटी रुग्णालय येथे पाठविण्यात येत आहे. यामध्ये गंभीर तसेच आपत्कालीन परिस्थितीमध्ये सुपर स्पेशालिटी मधील एक्स-रे मशीनचा वापर करण्यात येत आहे. त्यामुळे येथील एक्स-रे मशीनवरही ताण वाढला आहे.

## बनोटी येथे संजना ताई जाधव यांची विराट सभा





**कन्नड (अक्षय चव्हाण)** : संजना ताई जाधव यांनी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे नेतृत्वात महायुती सरकारचा लेखाजोखा जनतेसमोर सादर केला, राज्याच्या इतिहासात आतापर्यंत जनहिताच्या कल्याणकारी योजना आणून त्यावर त्वरित निर्णय घेणारे सरकार यापूर्वी कधीही नव्हते. तसेच महायुती सरकारने घेतलेले निर्णय हे महाराष्ट्राच्या इतिहासात न भूतो न भविष्य असे निर्णय आहेत. लाडके बहिण योजनेअंतर्गत माता-भगिनींना सक्षम करून त्यांना या माध्यमातून विकासाच्या वाटचालीत सोबत घेण्याचा प्रयत्न आहे. तसेच माझ्या तरुण बांधवांना नोकऱ्या देऊन त्यांचे भविष्य सुरक्षित करणे व याच सोबत शिक्षणामध्ये दिलेली सवलत अशा विविध योजना जनतेसाठी चालू केले असून त्या सक्षमपणे राबवण्याचे काम राज्यातील महायुती सरकारने केले आहे.

याप्रसंगी उपस्थित जनतेला महायुती सरकारची घटक म्हणून कन्नड येथून मला आपण विधानसभेवर पाठवून या मतदारसंघाचा कायापालट करण्याची संधी द्यावी अशी विनंती केली. यावेळी मोठ्या संख्येने महायुतीचे कार्यकर्ते,पदाधिकारी तसेच बनोटी येथील ग्रामस्थ उपस्थित होते. बनोटी येथे संजना ताई जाधव यांची विराट सभा

## विरोधकांनी लोकांकरिता काय केले याचा हिशेब द्या: डॉ. विजयकुमार गावित यांचा कॉंग्रेसला प्रश्न

**नंदुरबार** : आम्ही तीस वर्षात काय केले त्याचा लेखाजोखा लोकांना तोंडपाठ आहे. जिल्हा निर्मिती केली, रस्ते, धरण, बंधारे पूर्ण करण्याबरोबरच शेती विकास केला. शेतकऱ्यांना गायी, बकऱ्या दिल्या. महिलांना गृह उद्योग दिले, गरिबांना घरे दिली. इतकेच नाही तर भांडे, गॅस, सुरक्षा संच हे पण आमच्या प्रयत्नांमुळे लोकांना सरकारकडून मिळाले. आम्ही तीस वर्षात काय केले, असा प्रश्न करून विरोधकांनी जनतेचा कळवळा दाखवण्याची गरज नाही. लोकांसाठी त्यांनी काय केले, याचा हिशेब आमच्या विरोधकांनी मांडावा, असे आव्हान नंदुरबारचे महायुतीचे उमेदवार डॉ.विजयकुमार गावित यांनी दिले.

कुकावल, कोठलीत, वडाळी, कोंढावळ, काकर्दे दिगर, काकर्दे खु., खापरखेडा, अभनपूर, हिंगणी, तोरखेडा, दोंडवाडे, फेस, बामखेडा आणि अन्य गावांमधील मतदारांशी डॉ.गावितांनी संपर्क साधला. यावेळी त्यांच्यासोबत ज्येष्ठ नेते दीपक पाटील, जि.प. बांधकाम सभापती हेमलता शितोळे, जि.प. सदस्य के.डी. नाईक, भाजप ज्येष्ठ नेते डॉ.कांतीलाल टाटिया, प्रकाशा मंडळाध्यक्ष विजय पाटील, रवींद्र राउळ, प्रशांत चव्हाण, उमेश पाटील, रामराव बोरसे, संजय भदाणे, तुळशीराम कोळी, सुनील कुवर, कृष्णा कोळी, दिलवर माळचे आदी उपस्थित होते. कॉंग्रेसच्या नेत्यांनी तुमची केवळ दिशाभूल केली, भूलथापा दिल्या. दर महिन्याला साडेआठ हजार रुपये खटाखट दिले जातील, असे म्हणाले होते. तुम्हाला खटाखट पैसे मिळाले का? मोदी सरकार आणि राज्यातील महायुती सरकार आपल्या शब्दांवर ठाम आहे. मोदी सरकारने सांगितले होते आरक्षण हटवणार नाही. सत्ता आल्यानंतर त्यांनी आरक्षणाला धक्का लावलेला नाही. जनतेने विरोधकांच्या भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहन डॉ.विजयकुमार गावित यांनी केले.

## पंचायत समिती कर्मचाऱ्यांनी घेतली मतदानाचा टक्का वाढवण्याची शपथ

**यावल** : येथील पंचायत समितीमध्ये शुक्रवारी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार जनजागृती कार्यक्रमाची सुरुवात झाली. कर्मचाऱ्यांनी पंचायत समितीच्या सभागृहात शपथ घेतली. संपूर्ण मतदारसंघात आता १९ नोव्हेंबरपर्यंत विविध प्रकारचे कार्यक्रम घेतले जाणार आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी प्रशासनाच्या वतीने सदर उपक्रम राबवण्यात येत आहे.

यावेळी निवडणूक गीत सादर करण्यात आले. १२ दिवस संपूर्ण मतदारसंघात विविध उपक्रमांद्वारे मतदार जनजागृतीला सुरुवात झाली आहे. संपूर्ण तालुक्यात यंदाच्या विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर मतदान झाले पाहिजे, या संदर्भात विविध उपक्रम राबवून मतदार जनजागृती केली जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने पथनाट्य, रांगोळी स्पर्धा, मतदार जनजागृती विषयी पोस्टर, चित्रकला व प्रश्नमंजुषा कार्यक्रम, संकल्प पत्र, मॅरेथॉन स्पर्धा, जनजागृती रॅली व मतदारांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करणार आहे. तहसीलदार मोहनमाला नाझीरकर, गटविकास अधिकारी डॉ. मंजूश्री गायकवाड, सहाय्यक गटविकास अधिकारी किशोर सपकाळे, गटशिक्षणाधिकारी विश्वनाथ धनके यांच्या माध्यमातून संपूर्ण कार्यक्रम तालुक्यात राबवण्यात येत आहे. १९ नोव्हेंबरला या संपूर्ण कार्यक्रमाची सांगता होईल.

असे आहेत बारा दिवस कार्यक्रम ९ नोव्हेंबर रांगोळी स्पर्धा, १० रोजी पथनाट्य सादरीकरण, ११ रोजी शाळा महाविद्यालयात मतदार जनजागृती विषयक पोस्टर, चित्रकला व प्रश्न मंजुषा स्पर्धा, १२ रोजी मानवी साखळीद्वारे मतदार जनजागृती, १३ रोजी विद्यार्थ्यांकडून पालकांना मतदान संदर्भात संकल्प पत्र, १४ रोजी मॅरेथॉन स्पर्धा, १५ रोजी कामगारांसाठी कार्यक्रम, १६ रोजी मोटरसायकल रॅलीतून जनजागृती, १७, १८ आणि १९ रोजी प्रशासनातर्फे घरोघरी भेटी देऊन जनजागृती केली जाईल.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १० नोव्हेंबर २०२४


## २५४ किमी सायकल प्रवास करुन शंभुराजेंना अभिवादन:वारी परिवाराची मंगळवेढा- वढू बुद्रूक मोहिमेची सांगता, सायकलस्वारांचा केला गौरव

**मंगळवेढा :** वारी परिवाराची मंगळवेढा-तुळापूर-वढू बुद्रुक ही ऐतिहासिक सायकल मोहीम खरोखरचं आजच्या तरुणांना आदर्शवत आहे ,असे मत सॅप पार्टसचे पार्थ प्रसाद कुलकर्णी यांनी व्यक्त केले. वारी

वारी परिवाराच्या मंगळवेढा ते वढू बुद्रुक ऐतिहासिक सायकल मोहीमेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. यावेळी रिता कुलकर्णी, वैशाली कसगावडे, आशा आवताडे, पल्लवी हजारे, अनुसया आवताडे आदी उपस्थित होते.

कुलकर्णी पुढे बोलताना म्हणाले, छत्रपती संभाजी महाराजांची तुळापूर आणि वढूबुद्रुक समाधीस्थळे तरुणांना माहित व्हावीत त्याचा प्रसार करण्यासाठी 254 किलोमीटरचा टप्पा सायकलवरती पूर्ण करून महाराजांच्या समाधीस वंदन करून सर्व सायकल स्वारांनी आदर्श उभा केला आहे असे सांगून सर्वांचे स्वागत केले.

सायकल यात्रा तुळापुर येथे आल्यावर छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधीस्थळी दीपोत्सव करून पूजन करण्यात आले.

या ठिकाणाची माहिती तरुणांना व्हावी तसेच पर्यटन विकास जनजागृतीसाठी माहितीपर पत्रके वाटून प्रबोधन करण्यात आले. मोहीमेकरीता सॅप पार्टसचे मॅनेजिंग डायरेक्टर प्रसाद कुलकर्णी,अंकुश आवताडे यांचे विशेष सहकार्य लाभले. ऐतिहासिक सायकल मोहीमेत सहभागी झालेल्या सर्व सायकलस्वारांचा मोहीम फत्ते केल्याबद्दल समाधी स्थळासमोर सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक प्रा विनायक कलुबर्मे यांनी केले तर आभार अरुण गुंगे यांनी मानले.

## आधी शेतकऱ्यांचे पैसे द्या, मगच मुख्यमंत्रीपदाच्या गप्पा करा ; अजित पवारांची जयंत पाटलांवर टीका



**सांगली :** उपमुख्यमंत्री अजित पवारांनी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष व उमेदवार जयंत पाटील यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. पहिल्यांदा लोकांच्या समस्येवर, शेतकऱ्यांना पैसा द्या, मग मुख्यमंत्रीपदाच्या गप्पा मारा, अशा शब्दात जयंत पाटील यांच्यावर अजित पवारांनी टीका केली आहे.

**मग मुख्यमंत्रीपदाच्या गप्पा मारा** अजित पवार म्हणाले, पहिल्यांदा शेतकऱ्यांना पैसा द्या, मग मुख्यमंत्रीपदाच्या गप्पा मारा.

कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे पैसे हाणले, दुसऱ्या ठिकाणी काढलेले कारखाने हाणण्याचे काम जयंत पाटील करतात. लोकांना पिण्याचे पाणी देत नाहीत, त्यांच्या अंगातच पाणी नाही तर लोकांना कुठून देणार? लोकांचे प्रश्न सोडवायचे असेल तर धमक आणि ताकद लागते. ३५ वर्ष लोकप्रतिनिधी म्हणून काम करतात.

परंतु, साधी एमआयडीसी उभारण्याचे काम झाले नाही. नेतृत्व विकास करणारे लागते, नुसते काय सांगता, काय बोलता, असे बोलून होत नाही. अरे काय सांगता, काय सांगता. मी जे सांगतो तुमच्या डोक्यात घुसत नाही मग काय सांगू?

**तुमचे सरकार होते तेव्हा झोपा काढत होता का?** महाविकास आघाडीच्या पंचसूत्रीवर टीका करताना अजित पवार म्हणाले, २५ लाख रुपये प्रत्येक कुटुंबाला विम्याचा संरक्षण यांच्या बापाने दिले होते का? आम्ही दीड हजार दिल्यावर ते ३ हजार द्यायला निघाले मग तुमचे सरकार होते तेव्हा झोपा काढत होता का? देशाचे विरोधी पक्षनेते खटाखट पैसे देतो असे सांगतात, देशाचे विरोधी पक्ष नेते उल्लू बनवत आहेत, पण आम्ही काही गोट्या खेळत नाही. गेल्या अनेक वर्षांपासून जे नेते सांगत आहेत घड्याळाचे बटन दाबा, मी देखील तेच सांगतोय, मी काही वेगळे सांगत नाही.

**गलिच्छ राजकारण इस्लामपूरमधील नेतृत्वाने केले** अजित पवार म्हणाले, मी मुस्लिम समाजाला देखील बरोबर घेऊन जात काम करतो. मुस्लिम समाज देखील महत्त्वाचा आहे, त्या समाजाला देखील संधी मिळाली पाहिजे, म्हणून मी इद्रिस नायकवडी यांना विधान परिषदेवर आमदार केले. अगदी गलिच्छ राजकारण इस्लामपूरमधील नेतृत्वाने केले आहे. निवडणुकीपुरते आमचे राजकारण असते, निवडून आल्यावर आम्ही राज्याची कामे करण्यासाठी बसतो.

**लोकांनी विश्वास ठेवायचा कोणावर?** जयंत पाटलांच्या गावातील पोलिस स्टेशन आज देखील भाड्याच्या जागेत आहे. जयंत पाटलांना त्यांच्या गावातील पोलिस स्टेशन बांधता येत नाही आणि हे निघाले राज्याचे नेतृत्व करायला. उमेदवारांना उभ करायचे आणि तिथे मॅच फिक्सिंग करून मिली भगत करून उमेदवार पाडायचे हे राजकारण जयंत पाटलांचे आहे. नेताच काट्याने काटा काढायला लागला तर लोकांनी विश्वास ठेवायचा कोणावर? असा सवाल अजित पवारांनी उपस्थित केला आहे.









## आमदाराच्या मुलाचे अपहरण करून दहा कोटींची खंडणी मागितली; महिले सोबत आक्षपार्ह व्हिडिओ ही बनवला



**पुणे :** शिरूर हवेली मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) उमेदवार अशोक पवार यांच्या 30 वर्षीय ऋषिराज पवार या मुलाचे अपहरण करून, त्याला जबरीने विवस्त्र करून व तिथे एका स्त्रीला आणून तिला विवस्त्र करून अश्लील व्हिडिओ फोटो काढण्यात आले ते व्हायरल करण्याची धमकी देत दहा कोटीची मागणी करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. याप्रकरणी ऋषीराज पवार यांनी चार आरोपी आणि एक अज्ञात महिला यांच्या विरोधात शिरूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

याबाबत माहिती देताना पत्रकार परिषदेत आमदार यांच्या कन्या आम्रपाली पवार, ॲड असीम सरोदे ,ॲड श्रेया आवळे, ॲड संदीप लोखंडे उपस्थित होते. तर व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे ऋषिराज पवार आणि आमदार अशोक पवार यांनी भावना व्यक्त केल्या.

याबाबत पवार यांचे वकील असीम सरोदे म्हणाले, ज्ञानेश्वर कटके हे शिरूर मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाकडून निवडणूक लढत आहे. अशोक पवार यांचे कार्यकर्ते भाऊ कोळपे याने ऋषिराज पवार यास सांगितले की, काही कार्यकर्त्यांच्या पक्ष प्रवेशासाठी एका महत्वाची बैठकीसाठी मांडवगण फराटा येथे शनिवारी दुपारी दोन वाजता घेऊन गेले. त्याठिकाणी त्याला एका घरात नेऊन डांबून ठेवत त्याला धमकावून त्याचे हात- पाय बांधून विवस्त्र करण्यात आले आणि त्याठिकाणी एका महिलेस आणून तिला विवस्त्र करण्यात आले आणि आक्षेपार्ह फोटो काढण्यात आले. त्याला तीन आरोपी म्हणाले, तुमच्या विरोधातील लोक आमच्या संपर्कात असून तुझे अश्लील व्हिडिओ व्हायरल करून पैसे मिळवू. आम्हाला दहा कोटी रुपये दे तरच आम्ही हे व्हिडिओ आणि फोटो व्हायरल करणार नाही अशी धमकी दिली. माझ्याकडे पैसे आत्ता नाही मी त्याबाबत व्यवस्था करतो असे त्याने सांगितले. मात्र,आरोपी यांनी त्यास धमकावले त्यावेळी दुसऱ्या ठिकाणी जाताना ऋषिराज याने त्याच्या मित्रांना बोलवून घेतले त्यांनी एका आरोपीस पकडून ठेवले आणि मोबाईल खेचून घेत त्यातील फोटो आणि व्हिडिओ स्वत:कडे घेतले. या घटनेने मानसिक दबाव मध्ये त्याच्यासह कुटुंबीय आहे. यामध्ये जे दोषी आहे त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. याबाबत निवडणूक आयोगाने गांभीर्याने दखल घेऊन कारवाई करणे गरजेचे आहे त्यासाठी आम्ही तक्रार दाखल करत आहे.

अशोक पवार म्हणाले, राजकारण किती खालच्या स्तरावर गेले आहे यातून हे दिसून येते. मुलाचे अपहरण करणे, त्यास डांबून ठेवणे, कपड्याने गळा आवळणे, सुरा लावणे, धमकावणे, विवस्त्र करणे या गोष्टी घृणास्पद आहे. पोलिसांनी याबाबत सूत्रधार याचा शोध घ्यावा. या घटनेचा मी निषेध व्यक्त करत आहे.